RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष ८, अंक ७२(२)]** **मंगळवार, मे ३१, २०२२/ज्येष्ठ १०, शके १९४४** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक १९७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मे २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक सीएलआर-१०२१/प्र.क्र.१७५(१)/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम तात्काळ अंमलात आणणे आवश्यक वाटते, म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा २५) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिध्दी शिवाय हे नियम तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) कलम १४३ च्या पोट-कलम (२) मधील खंड (ग) आणि (ज१) (दोन) आणि पोट-कलम (३) च्या परंतुकातील तरतुदीनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे,–

१. या नियमांना, "महाराष्ट्र देशी मद्य (तिसरी सुधारणा) नियम, २०२२" असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ (यात यापुढे ज्याचा "प्रधान नियम" असा निर्देश करण्यात आलेला आहे.) च्या नियम २ मधील खंड (इ) मध्ये आधीच्या मजकुराऐवजी खालील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे:–

"(इ) "देशी मद्य" म्हणजे उर्ध्वपतन प्रक्रियेद्वारे अथवा वेगवेगळ्या तीव्रतेचे मद्यार्क एकत्र करून आणि अर्क व स्वाद देणारे पदार्थ यांसह अथवा याशिवाय उत्पादित मद्य परंतु असे देशी मद्य जे कायद्यातील कलम २ मधील उप-कलम १७ अन्वये कायद्याच्या उद्देशासाठी विदेशी मद्य म्हणून जाहीर केलेले आहे त्याचा अंतर्भाव नसलेले."

३. प्रधान नियमातील नियम ६ मध्ये उप-नियम (२४) नंतर खालील उप-नियम समाविष्ट करण्यात येत आहेः—

"(२४ अ) ६२.५° प्रुफ तीव्रता असलेल्या देशी मद्याचे लेबल केवळ पांढऱ्या कागदावर काळ्या शाईने उप-नियम (२४) मध्ये नमूद केल्यानुसार मुद्रीत करण्यात यावे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatama Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 31st May 2022

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

No. CLR-1021/C.R.175 (1)/Excise-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, should be brought into force at once, and therefore the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*c*) and sub-clause (*ii*) of clause (*h1*) of sub-section (*2*) read with proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973, as follows, namely:-

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Third Amendment) Rules, 2022.

2. In rule 2 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973 (hereinafter referred to as "the principal Rules") for clause (*e*), the following clause shall be substituted, namely:-

"(*e*) "Country Liquor" means liquor manufactured either by the process of distillation or by compounding or blending spirits with or without essence and flavouring substance but does not include country liquor which is declared for the purposes of the Act, to be foreign liquor, under the proviso to clause (*17*) of section 2 of the Act."

3. In rule 6 of the Principal Rules, after sub-rule (*24*) the following sub-rule shall be inserted, namely :–

"(24 A) The Label of Country Liquor having proof strength 62.5° shall be printed only on white paper with black ink as prescribed in sub-rule (*24*)."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.